


दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २७५ । शनिवार १ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# नगर, श्रीगोंदा व संगमनेर तालुक्यांत शेळ्या चोरणारी टोळी गजाआड

## एलसीबीच्या कारवाईत १० लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर, श्रीगोंदा, संगमनेर व रांजणगाव परिसरांत शेळ्या आणि बोकड चोरी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. या कारवाईत पोलिसांनी ४ आरोपींना ताब्यात घेतले असून मटण विक्रेत्यासह एकूण १० लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामुळे शेळी चोरीचे तब्बल १२ गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केडगाव बायपास येथे सापळा रचला. संशयास्पद टाटा सुमो गोल्ड (-१२--०१७१) वाहनाची तपासणी केली असता गाडीत चोरीच्या शेळ्या मिळून आल्या.

या कारवाईत ओमकार परंवार, शहाबाज कुरेशी, सक्षम भोर आणि अरबाज कुरेशी (सर्व रा. पुणे परिसर) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून ३ शेळ्या, १ बोकड, २ मोबाईल आणि चारचाकी वाहन असा ९ लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

कडक चौकशीदरम्यान आरोपींनी अहिल्यानगर, संगमनेर, श्रीगोंदा आणि रांजणगाव एमआयडीसी क्षेत्रातून शेळ्या चोरल्याची कबुली दिली. चोरलेल्या शेळ्या मटण विक्रेत्यांना विकल्याचे उघड झाले. पोलिसांनी मटण विक्रेता इरफान कुरेशी (रा. लोणी काळभोर) याच्याकडून विकलेल्या शेळ्यांची ५० हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली. फैजल कुरेशी, सिराज कुरेशी, शाहीद कुरेशी व रझा शेख या फरार मटण विक्रेत्यांचा पोलीस शोध घेत आहेत.

पुढील तपासासाठी आरोपींना संगमनेर तालुका पोलीस ठाण्याच्या हवाली करण्यात आले आहे.



सामाजिक कार्यकर्ते भिमराज आव्हाड यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक मयूर (बाली) बांगरे, संभाजी पवार व इतर.

# गेवराईतून चोरीला गेलेली थार एलसीबीकडून जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गेवराई (जि. बीड) येथून चोरीस गेलेली महिंद्रा थार कार शोधून काढण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी चोरीची गाडी जप्त करून एका आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

महात्मा फुले नगर (गेवराई) येथील रहिवासी राज भुराजी शिंदे यांची महिंद्रा थार (क्र. -१४--५८५८) दिनांक २० जुलै रोजी रात्री अज्ञात चोरट्यांनी लॉक तोडून लांबवली होती. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गेवराई पोलिसांच्या विनंतीवरून अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी सपोनि हरीष भोये, संदीप पवार आणि बाळासाहेब खेडकर यांचे एक विशेष पथक स्थापन केले. तपास पथकाने गुप्त बातमीदाराच्या मदतीने आणि कौशल्याने माहिती मिळवून आरोपी मारूती देमाजी पादीर (रा. धनगरवाडी, ता. अहिल्यानगर) याला ताब्यात घेतले.

आरोपीच्या चौकशीनंतर तपोवन रोड, अहिल्यानगर येथील सद्गुरू टॉवर शेजारील पार्किंगमधून चोरीची महिंद्रा थार सुस्थितीत हस्तगत करण्यात आली.

# अण्णाभाऊ साठे व वीर लहुजी वस्ताद साळवे यांचे पूर्णाकृती पुतळे अहिल्यानगरात उभारणार - आमदार संग्राम जगताप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त सिद्धार्थ नगर येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास आमदार संग्राम जगताप यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या महापुरुषांनी केवळ राज्यालाच नव्हे तर संपूर्ण देशाला दिशा देण्याचे कार्य केले आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य व शाहिरीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाची चळवळ उभी केली. त्यांनी ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत सर्वसामान्यांमध्ये सामाजिक जागृती निर्माण केली आणि अन्यायाविरोधात आवाज बुलंद केला.

ते पुढे म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला ‘‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा‘‘ हा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन असून ज्ञानाच्या बळावर व्यक्ती स्वतःच्या पायावर उभी राहून समाजालाही योग्य दिशा देऊ शकते. महापुरुषांचे विचार समाजाच्या ■ पान ४ वर

# केडगावमध्ये साडेचार लाखाची घरफोडी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगावमधील सचिननगर परिसरात चोऱ्यांनी दरवाजाचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल असा एकून ४ लाख ४४ हजार रुपय किंमतीचा ऐवज लांबविला याप्रकरणी फिर्यादी अभिजित सुधाकर काजळे (वय ३७, धंदा - खाजगी नोकरी, रा. सचिननगर केडगाव) यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूध्द घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ३० जुलै रोजी रात्री ११ ते ३१ जुलैच्या सकाळी ८ या दरम्यान ही चोरी झाली. अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या राहत्या घराचे बंद दरवाजाचे कुलूप तोडून ही चोरी केली.

घटनास्थळी उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, कोतवालीचे पोलिस निरीक्षक देशमुख यांनी भेट घेवून पाहणी केली. तपास सपोनि सपकाळे करीत आहेत.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लाल टाकी परिसरात आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते अभिवादन

## विविध सामाजिक उपक्रम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त लाल टाकी-भारस्कर कॉलनी येथे गौरवशाली मातंग इतिहास संवर्धन संघटन, मातंग एकता आंदोलन, सत्यशोधक बहुजन आघाडी , अखंड लाल टाकी मातंग समाज तसेच विश्व हिंदू परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक मोहित पंजाबी, जय भोसले, राम वडागळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्र प्रांत संघचालक नानाजी जाधव, जनकल्याण रक्तपेढीचे अध्यक्ष अरुण मिस्त्री, सुनील खिस्ती, विश्व हिंदू परिषद महामंत्री नगर जिल्हा अनिल जोशी, राजेंद्र चुंबळकर, शरद नगरकर, चंद्रकांत काळोखे, सोमनाथ चितळकर, अनिल देवराव, शिवाजी वेतन, योगेश देवकर, बाळी जोशी, सागर खरे, निशांत नन्नवरे, निलेश साठे, विनोद शिरसाट, नितीन घोरपडे, आकाश जगधने, सुनील ढोले यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ■ पान ४ वर

# राजमाता जिजाऊच्या ५ अत्याधुनिक एसटी बसेचे लोकार्पण

## आमदार दातेंच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर –** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि प्रवाशांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आमदार काशिनाथ दाते सरांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आणखी एक यश मिळाले असून, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या राजमाता जिजाऊ बससेवेअंतर्गत पारनेर आगाराला मिळालेल्या पाच अत्याधुनिक एसटी बसेसचे लोकार्पण आज आमदार दाते सरांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले, ‘‘पारनेर आगाराच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे यापूर्वीही अनेक नवीन बसेस उपलब्ध झाल्या आहेत. आता राजमाता जिजाऊच्या पाच अत्याधुनिक बसेस पारनेरच्या सेवेत दाखल झाल्याने प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि दर्जेदार प्रवासाचा लाभ मिळणार आहे. कालच नव्याने रुजू झालेले डेपो व्यवस्थापक अमोल कोतकर यांनी पारनेर आगारासाठी पाच नवीन बसेस मंजूर झाल्याची माहिती दिली. आवश्यक चालक पाठविल्यानंतर रात्री उशिरा या बसेस पारनेर आगारात दाखल झाल्या आणि आज नागरिक, महायुतीचे पदाधिकारी तसेच एसटी महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, चालक व वाहक यांच्या उपस्थितीत या बसेसचे लोकार्पण करण्यात आले,‘‘ असे त्यांनी सांगितले.



‘महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ गेल्या काही वर्षांत प्रवाशांना अधिक दर्जेदार व आधुनिक सेवा देण्याच्या दिशेने सकारात्मक बदल करत असून, राजमाता जिजाऊ ही अत्याधुनिक बससेवा त्याचे उत्तम उदाहरण आहे. आमदार काशिनाथ दाते सर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पारनेर आगाराला पाच नवीन बसेस उपलब्ध झाल्या आहेत. या बसेसमधील अधिक आसनक्षमतेमुळे विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. भविष्यातही अशाच आधुनिक सुविधा आणि अधिकाधिक नवीन बसेस पारनेर आगाराला उपलब्ध करून देण्यासाठी एसटी महामंडळाने प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा आहे.’

**ज्येष्ठ पत्रकार संजय वाघमारे**

आमदार काशिनाथ दाते सर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पारनेर आगाराला राजमाता जिजाऊच्या पाच अत्याधुनिक एसटी बसेस मिळाल्या, ही पारनेर तालुक्यासाठी आनंदाची बाब आहे. या बसेसमुळे विशेषतः महिला, विद्यार्थिनी, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी व सुलभ प्रवासाची सुविधा मिळणार आहे. जनतेच्या मूलभूत सुविधांसाठी आमदार दाते सर सातत्याने करत असलेले प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत.

**सौ. सुषमा रावडे,**
तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, पारनेर तालुक्यातील प्रवाशांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असून, भविष्यातही पारनेर आगाराला आवश्यक त्या सर्व सुविधा आणि नवीन बसेस उपलब्ध करून ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### अशोकचक्राच्या संविधानिक नैतिकतेतून जातिनिर्मूलनाचा एल्गार!

अहिल्यानगर - भारतीय संसदीय लोकशाहीला व्यक्तिपूजा, घराणेशाही, जातीय व धार्मिक ध्रुवीकरण, धनशक्ती, भ्रष्टाचार आणि निष्क्रिय नोकरशाहीच्या विळख्यातून मुक्त करण्याच्या उद्देशाने येत्या ८ ऑगस्ट २०२६ पासून देशभर 'जंतर-मंतर क्रांती दिवस' पाळून 'तिरंगा सत्याग्रह' सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा 'पीपल्स हेल्पलाईन' आणि 'भारतीय जनसंसद'च्या वतीने करण्यात आली आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून संविधाननिष्ठ लोकशाही, सामाजिक समता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकाभिमुख प्रशासन याबाबत व्यापक जनजागृती केली जाणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.यावेळी बोलताना ॲड. गवळी यांनी सांगितले की, तिरंगा हा केवळ राष्ट्रध्वज नसून भारतीय लोकशाहीची मूल्यव्यवस्था आणि संविधानिक तत्त्वज्ञानाचे प्रभावी प्रतीक आहे. तिरंग्याचा मूळ सन्मान आणि स्वरूप अबाधित ठेवून त्यातील प्रत्येक रंगामागील लोककल्याणकारी मूल्ये समाजात रुजविण्याचा प्रयत्न या सत्याग्रहातून केला जाणार आहे.तिरंग्यातील रंगांची नव्या दृष्टिकोनातून मांडणी करुन तिरंगा सत्याग्रहाच्या माध्यमातून राष्ट्रध्वजातील रंगांना विशिष्ट लोकशाही मूल्यांशी जोडण्यात आले आहे. केशरी रंग लोकभक्ती : केवळ मानवकल्याण नव्हे, तर संपूर्ण जीवसृष्टी, पर्यावरण आणि निसर्गसंवर्धनाची बांधिलकी. पांढरा रंग ज्ञानभक्ती : अद्ययावत ज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकनिष्ठ विचार आणि पारदर्शक निर्णयप्रक्रिया. हिरवा रंग कर्मभक्ती : प्रत्यक्ष, प्रामाणिक, जबाबदार आणि परिणामकारक लोकसेवा. अशोकचक्र संविधानिक नैतिकता : कायद्याचे राज्य, समानता, सामाजिक न्याय, जातिनिर्मूलन आणि लोकशाही मूल्यांचे अखंड प्रतीक. ॲड. गवळी यांनी स्पष्ट केले की, अशोकचक्र हे केवळ राष्ट्रध्वजाच्या मध्यभागी असलेले निळे चक्र नसून, ते संविधानिक मूल्यांचे सतत स्मरण करून देणारे न्यायचक्र आहे. लोकभक्ती संविधानाशिवाय भावनिक लोकानुनयात, ज्ञानभक्ती लोकशाही नियंत्रणाशिवाय तंत्रशाहीत () आणि कर्मभक्ती कायद्याच्या चौकटीशिवाय मनमानीत रूपांतरित होऊ शकते. त्यामुळे अशोकचक्राचे अखंड फिरणे म्हणजे सत्ता, प्रशासन आणि समाजावर संविधानिक नैतिकतेचे सातत्याने नियंत्रण राहणे होय.

## राज्यस्तरीय स्केटिंग मॅरेथॉन स्पर्धेत ज्ञानसंपदा स्कूलची सुवर्णमय कामगिरी; अहिल्यानगर जिल्ह्यास मानाची प्रथम ट्रॉफी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बारामती येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय स्केटिंग मॅरेथॉन स्पर्धेत ज्ञानसंपदा स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट कौशल्य, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन करत सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांची लक्षणीय कमाई केली. महाराष्ट्रातील तब्बल २७ जिल्ह्यांतील खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. अत्यंत चुरशीच्या या स्पर्धेत ज्ञानसंपदा स्कूलच्या १५ विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत आपल्या शाळेचा आणि अहिल्यानगर जिल्ह्याचा नावलौकिक उंचावला.

विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशामुळे अहिल्यानगर जिल्ह्याला मानाची प्रथम क्रमांकाची विजेती ट्रॉफी प्राप्त झाली. या अभिमानास्पद यशाने अहिल्यानगरचे नाव महाराष्ट्राच्या क्रीडा इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले.

या दैदिप्यमान यशाबद्दल ज्ञानसंपदा स्कूलच्या प्राचार्या शिवांजली अकोलकर यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे मनः पूर्वक अभिनंदन करून त्यांच्या भावी क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच या यशामागे मॅरेथॉन स्केटिंग नगरचे अध्यक्ष गोरक्ष धात्रक

यांचे लाभलेले प्रेरणादायी मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रशिक्षण महत्त्वाचे ठरल्याचे त्यांनी नमूद केले.

ज्ञान, संस्कार आणि गुणवत्तेसोबतच क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांना उत्कृष्टतेच्या शिखरावर नेण्याचा ज्ञानसंपदा स्कूलचा संकल्प या यशामुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाला असून, शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षात या यशाने आणखी एका मानाच्या सुवर्णपानाची भर पडली आहे.

## मलेशियातील जागतिक परिषदेसाठी हेल्थ प्लॅनर सविता नितीन बोठे यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एचडीएफसी एर्गो हेल्थ इन्शुरन्सच्या वतीने मलेशिया येथे १ ते ५ ऑगस्ट दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय जागतिक परिषदेसाठी अहिल्यानगर येथील हेल्थ प्लॅनर तथा श्रीराम इन्शुरन्स सर्व्हिसेसच्या संचालिका सविता नितीन बोठे यांची निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विमा क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

या जागतिक परिषदेसाठी संपूर्ण भारतातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मोजक्या विमा सल्लागारांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये अहिल्यानगरच्या सविता बोठे यांनी स्थान मिळवले आहे. परिषदेत जगभरातील विमा क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित राहून आरोग्य विमा क्षेत्रातील नव्या संकल्पना, आधुनिक सेवा, नवीन पॉलिसी, ग्राहकाभिमुख योजना तसेच कंपनीची भावी ध्येयधोरणे याविषयी सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. विविध तांत्रिक सत्रे, चर्चासत्रे आणि



अनुभवांची देवाणघेवाण याद्वारे सहभागी प्रतिनिधींना आंतरराष्ट्रीय स्तरावरील ज्ञान मिळणार आहे.

या निवडीबद्दल एचडीएफसी एर्गो हेल्थ इन्शुरन्सच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने सविता नितीन बोठे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शाखेतील अधिकारी, विमा सल्लागार तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. सविता बोठे यांच्या या यशामुळे अहिल्यानगरच्या विमा क्षेत्राचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव झाला असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## बुगेवाडीत एक कोटी रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील बुगेवाडी येथे सुमारे एक कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. रस्ते, पायाभूत सुविधा व ग्रामविकासाला चालना देणाऱ्या या विकासकामांमुळे बुगेवाडीच्या सर्वांगीण प्रगतीला नवे बळ मिळणार आहे.

यावेळी आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले की, ''विकास हीच आपली राजकारणाची खरी ओळख आहे. गावागावांत मूलभूत सुविधा निर्माण करून नागरिकांचे जीवनमान उंचावणे, प्रत्येक वस्तीपर्यंत दर्जेदार रस्ते, पाणी, वीज आणि आवश्यक सुविधा पोहोचविणे हेच माझे ध्येय आहे. मतदारसंघातील कोणतेही गाव विकासापासून वंचित राहणार नाही. जनतेने दाखविलेल्या विश्वासाला न्याय देत विकासाची ही वाटचाल भविष्यातही अधिक वेगाने सुरू राहील,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या विकासकामांमुळे बुगेवाडीसह परीसरातील दळणवळण अधिक सुलभ होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून भविष्यातही बुगेवाडीसह संपूर्ण मतदारसंघाच्या विकासासाठी सातत्याने निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, नगरसेवक अशोक चेडे, शहराध्यक्ष राजेंद्र औटी, सुनील गाडगे, नगरसेवक नवनाथ सोबले, शहरप्रमुख कविता औटी, सखाराम बुगे, रामदास कावरे, विजय कावरे, सुनिता सोबले, कुंडलिक कावरे, साहेबराव बुगे, ठकाराम बुगे,

> **'आमदार काशिनाथ दाते सर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे बुगेवाडी परिसरातील तब्बल एक कोटी रुपयांच्या विकासकामांना गती मिळाली आहे. या विकासकामांमुळे नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर होऊन गावाच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे. विकासाच्या माध्यमातून जनतेचा विश्वास संपादन करणारे आमदार काशिनाथ दाते सर यांचे नेतृत्व पारनेर तालुक्यासाठी निश्चितच प्रेरणादायी आहे,'**
>
> **विठ्ठल कावरे, उद्योजक**

विठ्ठल कावरे, सिताराम बुगे, शिवाजी काळे, रोहीदास भुसारे, मंगेश कावरे, प्रतिभा कावरे, संतोष थोरात, रामदास वाळुंज, सागर वैद्य, सोपान कावरे, कोंडीभाऊ थोरात, शरद कावरे, प्रशांत कावरे, मयुर कावरे, यश बुगे, बाळासाहेब सोनवणे, चिन्मय कावरे, शांताराम तराळ, प्रसाद बुगे, प्रतिक चत्तर, भानुदास कावरे, संपत वारे, गणेश बुगे, सखाराम कावरे, धनाजी थोरात, रामदास थोरात, भाऊसाहेब बुगे, सुनील कावरे, इंजि. प्रताप अंबुले, फारुख शेख, नागेश रोहोकले यांच्यासह अनेक मान्यवर, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विकासकामांच्या शुभारंभामुळे बुगेवाडी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांनी आमदार काशिनाथ दाते सरांचे आभार व्यक्त करत विकासाची ही गती भविष्यातही कायम राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## शिष्यवृत्ती परीक्षेत काकासाहेब म्हस्के विद्यालयाची उज्ज्वल कामगिरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काकासाहेब म्हस्के विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय मंथन परीक्षा व पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा विद्यालयाच्या वतीने गुलाबपुष्प देऊन कौतुक व गुणगौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक क्षेत्रातील लौकिकात आणखी भर पडली असून शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंथन परीक्षेत राज्यस्तरावर दहावा क्रमांक एकता भरत पवार,धनश्री सचिन जाधव, पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत हर्षवर्धन जाधव ,शिवम बडे ,ईश्वरी कोतकर, यांचे नेत्रदीपक यश मिळवले. स्पर्धात्मक वातावरणात झालेल्या या परीक्षेत विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यामुळे त्यांना हे यश मिळाले. विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला, अभ्यासातील सातत्याला आणि स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीला चालना देणारी महत्त्वपूर्ण परीक्षा मानली जाते. या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच स्पर्धात्मक दृष्टिकोन, आत्मविश्वास, वेळेचे नियोजन आणि अभ्यासाची शिस्त निर्माण होते. काकासाहेब म्हस्के विद्यालयातील विद्यार्थ्यांनी या परीक्षेत मिळविलेले यश हे विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक उपक्रमांचे फलित असल्याचे यावेळी शिक्षकांनी सांगितले.

यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुनंदा धामणे, तसेच श्रीमती सविता दहातोंडे ,श्रीमती. अंजली औटी, श्रीमती सुचिता पठारे,श्रीमती अर्चना गाडेकर,श्रीमती विजया साबळे,श्री. सुमेध मेढे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील अडचणी दूर करण्याबरोबरच त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, सराव परीक्षा घेणे, प्रश्नपत्रिकेचा नियमित सराव करून घेणे आणि वेळेचे योग्य नियोजन करण्यासाठी शिक्षकांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी भक्कम आधार मिळाला.

विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचे यश हे केवळ विद्यार्थ्यांचे नसून त्यामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि संस्थेने निर्माण केलेले शैक्षणिक वातावरण यांचा मोठा वाटा आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा मा. आमदार श्री. नरेंद्रजी घुले पाटील, संस्थेचे सचिव तथा मा. आमदार श्री. चंद्रशेखर घुले पाटील, अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. राजश्रीताई घुले पाटील, शेवगाव पंचायत समितीचे सभापती डॉ. क्षितिज भैया घुले पाटील, प्रशासकीय अधिकारी श्री. कारभारी नजन, संस्था समन्वयक श्री. विजय काशीद, प्राचार्या सौ. शितल बांगर, मुख्याध्यापिका सौ. सुनंदा धामणे आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत मिळविलेल्या यशामुळे विद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही स्पर्धात्मक परीक्षांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन मिळणार असून, भविष्यात आणखी विद्यार्थी अशा परीक्षांमध्ये यश मिळवतील, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## नेप्ती मंडळातील लाभार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात विविध योजनांचा लाभ

### पात्र लाभार्थ्यांना जागेवरच सेवा, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावा आणि महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्नांचा जागेवरच निपटारा व्हावा, या उद्देशाने भाळवणी येथील नंदनवन लॉन्स येथे ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'' उत्साहात पार पडले. या शिबिरात पारनेर विधानसभा मतदारसंघातील तसेच नगर तालुक्यातील नेप्ती मंडळातील शेकडो नागरिकांनी सहभाग घेत विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला.

शासनाच्या लोकाभिमुख उपक्रमातून महसूल विभागाच्या विविध सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे नागरिकांना विविध कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची गरज भासली नाही. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली कामे मार्गी लागल्याने लाभार्थ्यांनी शासन व प्रशासनाबद्दल समाधान व्यक्त केले.

शिबिरामध्ये नवीन शिधापत्रिका, संजय गांधी निराधार योजना, अभिलेख दुरुस्ती, वारस नोंदी, पोट खराबा जमीन लागवडीखाली आणणे, अज्ञान पालकत्व कमी करणे आदी महसूल विभागाच्या विविध योजनांचा लाभ पात्र नागरिकांना देण्यात आला. या शिबिरात रामदास अर्जुन जपकर, बाबासाहेब सखाराम होळकर, बाळासाहेब नामदेव कोल्हे, विजय पोपटराव होळकर ,सुयश तात्यासाहेब कर्डिले, मिराबाई सुरेश धोत्रे, मुन्नाबी रिजवान शेख, शारदा साहेबराव काळे, छाया साहेबराव काळे , साहिल हमीद सय्यद, कोकिळा शांताराम काळे या लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळाला. शासनाच्या लोकाभिमुख उपक्रमामुळे लाभार्थ्यांची प्रलंबित कामे मार्गी लागल्याने त्यांनी समाधान व्यक्त करत शासन व महसूल प्रशासनाचे आभार मानले.

यावेळी पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ वितरित करण्यात आले. शासनाच्या योजना केवळ कागदावर न राहता त्या प्रत्यक्ष पात्र नागरिकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, यासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अशा समाधान शिबिरांमुळे शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा अधिक मजबूत होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर, पारनेरच्या तहसीलदार गायत्री सौंदाणे, अहिल्यानगरचे तहसीलदार मिलिंद कुलथे, नेप्ती मंडळ अधिकारी प्रताप कळसे, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, ग्राम महसूल अधिकारी सुवर्णा रांधवन, विनायक दिक्षे, दिपक झेंडे, श्रीकृष्ण निमसे, दिपाली विधाते यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी व विविध विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

शिबिरादरम्यान नागरिकांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. शासनाच्या विविध योजनांची माहिती, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि पात्रतेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

## शब्दकोडे क्रमांक : १९



**आडवे शब्द :** १.समुद्र ३.कोरून केलेले ५.वर्तन ८.चांगले ९.नामस्मरण १०.एक भित्रा प्राणी १२.लोभी १४.समूह १६.कावळा १८.हस्त १९.मुलायम २१.विविध तऱ्हा २२.लाकडाची बांधलेली मोळी २५.धातूचा तंतू २७.कमावणारा ३०.सोबत ३१.जपणूक ३२.हाक ३४.गवताने भरलेला प्रदेश ३५.एक आदिवासी नृत्य ३७.माशाला पकडण्यासाठी वापरतात ३८.घनदाट ३९.विशिष्ट ढंग ४१.गणती ४३.मैत्रीण ४४.महत्त्वाचा ४६.चरबी ४७.सुंदर ४९.मज ५०.अति भव्य ५१.हेतू पुरते संबंध ठेवणारा

**उभे शब्द :** १.माहेर विरुद्ध २.गेलेला ३.खांदा आणि पंजा यांना जोडणारा सांधा ४.उजाड ६.लोखंडी सळी ७.मुलायम नसलेला ९.सातु ११.एक टिकाऊ लाकूड १३.दरवाजा उघडण्यासाठी दारावर केलेला आवाज १५.1000 किलो १६.कर्म १७.कामधंदा नसलेला २०.शिरा बनवण्यासाठी वापरतात २१.शिवरायांनी अफजलखानाचा कोथळा जिथे बाहेर काढला तो गड २३.परमेश्वर २४.छंदी २६.आकाश २८.पराभव २९.नादमय ठेका ३०.पहाट ३१.नाताळ मध्ये मुलांना खाऊ आणि भेट देतो तो ३३.धावपळ ३५.थाली ३६.मेणा कलाकारास रसिक प्रेक्षकांकडून मिळणारे कलेची पोच पावती ४०.एक हिंदी सिनेमा ४१.आनंद ४२.एक ताल ४३.प्रियकर ४५.हिंदीत अमिताभ बच्चन ,रजनीकांत,गोविंदा यांचा एक सिनेमा ४६.ढग ४८.बुद्धिबळातील एक डाव

### शब्दकोडे क्रमांक : १८ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुं | ब | ई | | गु | ला | ब | | क | म | ळ | |
| डा | | मा | ता | | ग | | प्र | सा | र | | नी |
| व | जी | र | | का | व | ड | | ई | म | ली | |
| ळया | | त | ड | जो | ड | | च | | र | | आ |
| | रे | | हा | ल | | शे | प | टी | | मा | जी |
| अ | णू | रे | णू | | ह | क | ला | | स | म | |
| | का | व | | को | क | रू | | स | वा | ला | ख |
| अ | | ती | स | | ना | | स | ह | ल | | डू |
| सा | य | | लो | क | क | ला | | ज | | पा | |
| धा | | व | खा | र | | ल | ग | | पा | य | री |
| र | य | त | | त | न | | ड | हा | ळी | | ता |
| ण | | न | क | ल | | मं | द | | व | न | |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### गुरुपौर्णिमेनिमित्त सनबीम्स प्री-प्रायमरीची रंगली संस्कारमय बालदिंडी



अहिल्यानगर - कर्नल परब संचलित सनबीम्स प्री-प्रायमरी शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि गुरुजनांविषयी आदरभाव रुजविण्याच्या उद्देशाने गुरुपौर्णिमा निमित्त संस्कारमय बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीच्या माध्यमातून चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांचा उत्साह, टाळ-मृदंगाचा निनाद आणि 'विठ्ठल... विठ्ठल...'च्या अखंड नामघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. भारतीय संस्कृतीमध्ये गुरुला सर्वोच्च स्थान असून, विद्यार्थ्यांच्या मनात गुरुंचे महत्त्व लहानपणापासूनच रुजावे तसेच गुरुजनांविषयी आदर, कृतज्ञता आणि संस्कारांची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हस्ते कर्नल परब स्कूलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ), गीता दिलीप परब, यांचे विधिवत गुरुपूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी गुरुंच्या चरणी नतमस्तक होत त्यांच्याप्रती आदर व्यक्त केला. शिलाविहार रोड येथील सनबीम्स प्री-प्रायमरी शाळेपासून बालदिंडीला उत्साहात प्रारंभ झाला. दिंडीने परिसरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करून विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापर्यंत प्रस्थान केले. दिंडीत सहभागी झालेल्या चिमुकल्यांनी वारकरी परंपरेचे दर्शन घडविणारी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. हातात टाळ, मृदंग आणि भगवे पताके घेऊन 'ज्ञानोबा-तुकाराम', 'विठ्ठल... विठ्ठल...' अशा नामघोषात विद्यार्थ्यांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात रंगविला. दिंडीचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांनीही रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती. या दिंडीत विद्यार्थ्यांसोबत शिक्षक, पालक आणि परिसरातील नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. चिमुकल्यांचा निरागस उत्साह आणि शिस्तबद्ध सहभाग पाहून उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले. दिंडीमुळे विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा, भक्ती, गुरु-शिष्य नाते आणि भारतीय संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. यावेळी सनबीम्स प्री-प्रायमरी शाळेच्या मुख्याध्यापिका भावना योगेश शिंगवी म्हणाल्या, ''आई-वडील हे प्रत्येक मुलाचे पहिले गुरु असतात. त्यानंतर शिक्षक मुलांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा देतात. लहान वयातच चांगले संस्कार, गुरुजनांविषयी आदर आणि भारतीय संस्कृतीची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे भावी पिढी सुसंस्कृत, सक्षम आणि मूल्यनिष्ठ नागरिक घडण्यास निश्चितच मदत होईल. गुरुपौर्णिमेचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे तसेच भारतीय संस्कृती व अध्यात्माची ओळख व्हावी, या उद्देशाने या बालदिंडीचे आयोजन करण्यात आले,'' असे त्यांनी सांगितले. या दिंडीसाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी विशेष परिश्रम घेतले.

### नागापूर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक चाँद शेख यांचा पुरस्काराने गौरव



अहिल्यानगर- शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना नगर तालुका तालिम सेवा संघाच्या वतीने राजर्षी शाहू महाराज राज्यस्तरीय क्रीडा रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. आषाढी एकादशी आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून निमगाव वाघा (ता. नगर) येथे आयोजित करण्यात आलेल्या 'जगतगुरू संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन' या सोहळ्यात उद्योजक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे आणि सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक रतिलाल चौधर यांच्या हस्ते चाँद शेख यांना मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला स्वागताध्यक्ष ॲड. आनंद सूर्यवंशी, संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे, सामाजिक कार्यकर्ते अशोक सूर्यवंशी, अनिताताई खरात, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, उद्योजक दिलावर शेख, निमगाव वाघा सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, डॉ. विजय जाधव, भाऊसाहेब ठाणगे यांच्यासह साहित्यप्रेमी, कवी, लेखक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शनी मारुती मंदिराच्या सुशोभीकरणासाठी

# उद्योजक उमेश प्रसाद यांच्याकडून १ लाख ५१ हजारांची देणगी

**लोकसहभागातून मंदिर विकासाचा संकल्प । मंदिर विकासासाठी भाविकांचा सहभाग अत्यावश्यक – ॲड. आगरकर**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** माळीवाडा पंचमंडळ देवस्थान ट्रस्टच्या शनी मारुती मंदिराच्या सुशोभीकरण व विकासकामांना गती देण्यासाठी उद्योजक उमेश अरुणकुमार प्रसाद यांनी १ लाख ५१ हजारांचा धनादेश देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांच्याकडे सुपूर्द केला. मंदिराच्या परिसराचे सुशोभीकरण, भाविकांसाठी अधिक सुविधा आणि धार्मिक वातावरण अधिक आकर्षक करण्याच्या उद्देशाने ही देणगी देण्यात आली.

यावेळी देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, ज्येष्ठ विश्वस्त पांडुरंग ननवरे, रंगनाथ फुलसौंदर, चंद्रकांत फुलारी, प्रा. माणिकराव विधाते, गणेश राऊत, मंदिराचे पुजारी अनंत पांडे, सचिन आगरकर यांच्यासह पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी उद्योजक उमेश प्रसाद यांच्या सामाजिक व धार्मिक बांधिलकीचे कौतुक करत त्यांच्या या योगदानामुळे मंदिराच्या विकासकामांना निश्चितच मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर म्हणाले, ''शनी मारुती मंदिर हे शहरातील श्रद्धास्थान असून येथे दररोज मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. मंदिराचे सुशोभीकरण, परिसराची स्वच्छता, आवश्यक सुविधा आणि भाविकांना अधिक चांगल्या वातावरणात दर्शन घेता यावे यासाठी देवस्थान ट्रस्ट सातत्याने प्रयत्नशील आहे. ही कामे केवळ ट्रस्टच्या माध्यमातून नव्हे, तर भाविकांच्या सक्रिय सहभागातूनच अधिक प्रभावीपणे पूर्ण होऊ शकतात.''

ते पुढे म्हणाले, ''उद्योजक उमेश प्रसाद यांनी कोणत्याही अपेक्षेशिवाय दिलेली ही देणगी प्रेरणादायी आहे. धार्मिक स्थळांचा विकास हा आपल्या संस्कृतीच्या जतनाशी निगडित विषय आहे. दानशूर व्यक्तींनी अशाच प्रकारे पुढे येऊन मंदिर विकासात योगदान दिल्यास भाविकांसाठी अधिक सुविधा उपलब्ध होतील आणि हे मंदिर आणखी भव्य व आदर्श स्वरूपात विकसित होईल.''

यावेळी उद्योजक उमेश अरुणकुमार प्रसाद यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ''शनी मारुती मंदिराविषयी माझ्या मनात विशेष श्रद्धा आहे. मंदिराचे सुशोभीकरण आणि विकास ही काळाची गरज असून या पवित्र कार्यात सहभागी होण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य समजतो. भविष्यातही धार्मिक उपक्रमांसाठी शक्य ते सहकार्य करण्याचा माझा प्रयत्न राहील.

देवस्थान ट्रस्टच्या वतीने उद्योजक उमेश प्रसाद यांचा सत्कार करण्यात आला.

# रोजगार निर्मिती होईल असा व्यवसाय सुरु करा – आ. संग्राम जगताप

**सावेडीमध्ये द बेला व्हिस्टा या खाद्य दालनाचे शुभारंभ**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी उपनगरातील कुष्ठधाम रोड वर द बेला व्हिस्टा या खाद्य दालनाचे शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले, या वेळी नगरसेवक मनोज दुलम, सामजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा, नगरसेवक महेश तवले, होटेल चायनिज चे संचालक मनोजशेठ बोज्जा खाद्य दालनाचे संचालक विशाल धात्रक, आकाश गर्जे आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना आ. जगताप म्हणाले युवक मुले नोकरीच्या मागे न लागता व्यवसाय करतात ही आनंदाची बाब असून व्यवसाय निवडताना ज्या व्यवसायातून रोजगार निर्मिती होईल असाच व्यवसाय निवडावा असे आवाहन केले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा यांनी व्यवसाय वाढीसाठी शुभेच्छा दिल्यात. पाहुण्याचे स्वागत विशाल धात्रक यांनी केले तर आभार आकाश गर्जे यांनी मानले.

## आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका मनसे ताकतीनिशी लढणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**






**पाथर्डी–** तालुक्यासह दक्षिण जिल्ह्यातील शेवगाव कर्जत जामखेड तालुक्यांमध्ये आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका महाराष्ट्र नवनिर्माण सेना राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने व संपर्क अध्यक्ष नयन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ताकतीनिशी लढणार असून त्यादृष्टीने उमेदवारांची चाचपणी सुरू असल्याचे दक्षिण मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी सांगितले

लवकरच चारही तालुक्याचा जिल्हा दौरा करून जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांचा आढावा घेण्यात येणार आहे मनसे पक्षाकडून निवडणूक लढवण्यासाठी अनेक जण इच्छुक असून इतर पक्षातील कार्यकर्ते संपर्कात आहेत तसेच आपण स्वतः सरपंच असल्याने जिल्ह्यातील सरपंचांशी चांगला संपर्क असून याचा देखील आगामी निवडणुकांमध्ये पक्षाला फायदा होणार आहे आजपर्यंत पक्षाने जनहिताची अनेक आंदोलने केली असून अनेक समस्या मार्गी लावल्या आहेत याचा निश्चित फायदा निवडणुकांमध्ये पक्षाला होईल व मनसे हा एक उत्तम पर्याय जनतेसमोर असेल.

पाथर्डी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत यावेळी उपजिल्हाध्यक्ष बंडू हंडाळ , पाथर्डी तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, शेवगाव तालुकाध्यक्ष मंगेश पाखरे उपस्थित होते.

# यशदातील प्रशिक्षणातून विकास योजनांची माहिती; सखुताई झारगड यांचा उत्स्फूर्त सहभाग



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पुणे येथील यशदा प्रशिक्षण केंद्रात पंचायत समिती पैठणच्या सदस्यांसाठी आयोजित तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत विविध शासकीय योजना, ग्रामीण विकास कार्यक्रम आणि राज्य शासनाच्या कामकाजाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणात पंचायत समिती व जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध विकास योजनांची माहिती देण्यात आली. तसेच लोकप्रतिनिधींनी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून गावांच्या सर्वांगीण विकासासाठी कशा प्रकारे काम करावे, याविषयी तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

या तीन दिवसीय प्रशिक्षणात चागतपुरी गणाच्या पंचायत समिती सदस्या सौ. सखुताई झारगड यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान व अनुभव ग्रामीण भागातील विकासकामे आणि शासकीय योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## गर्दीत नकळत गळून पडलेले

# महिलेच्या गळ्यातील दोन तोळ्यांचे दागिने केले परत

**मोहन औटींच्या प्रामाणिकपणाचा गौरव; सोन्यापेक्षा मौल्यवान ठरला प्रामाणिकपणा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पैश्यापेक्षा माणुसकी आणि प्रामाणिकपणा अधिक मोठा असतो, याचा प्रत्यय केडगाव येथे गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित महाप्रसाद सोहळ्यात आला. मोहिनी नगर येथील साई मंदिरात हजारो भाविक महाप्रसादाचा लाभ घेत असताना एका महिलेच्या गळ्यातील सुमारे दोन तोळ्यांचे सोन्याचे मिनी गंठण गर्दीत नकळत गळून पडले.

काही वेळाने गंठण हरवल्याचे लक्षात येताच त्या महिलेने मंदिर परिसरात शोधाशोध सुरू केली. अमूल्य दागिना हरवल्याने ती भावूक झाली होती. परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. महाप्रसाद वाटपाची सेवा बजावत असलेले साईभक्त मोहन (मामा) औटी यांच्या नजरेस ते सोन्याचे गंठण पडले. कोणताही मोह न बाळगता त्यांनी तत्काळ आयोजकांकडे जाऊन गंठण जमा केले आणि ध्वनिक्षेपकावरून ज्यांचे गंठण हरवले आहे त्यांनी ओळख पटवून ते घेऊन जावे, असे आवाहन करण्यास सांगितले.

घोषणा ऐकताच संबंधित महिला धावत आली. योग्य ओळख पटविल्यानंतर मोहन औटी यांनी तिच्या हाती सुरक्षितपणे सोन्याचे गंठण सुपूर्द केले. हरवलेली अमूल्य वस्तू परत मिळाल्याच्या आनंदाने त्या महिलेच्या डोळ्यांत अश्रू तरळले. तिने मोहन औटी यांचे मनापासून आभार व्यक्त केले. मोहन औटी यांच्या प्रामाणिकपणाचे साई सेवा मंडळ तसेच केडगाव ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून त्यांच्या प्रामाणिक व सेवाभावी वृत्तीचा गौरव करण्यात आला.

# अहमदनगर एज्युकेशन सोसायटीतर्फे जिल्हास्तरीय भक्तिसुमन स्पर्धा २०२६

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने जिल्हास्तरीय भक्तिसुमन स्पर्धा २०२६ आयोजित करण्यात आली असून जिल्ह्यातील अभंग व भक्तिगीत गायनाची आवड असलेल्या स्पर्धकांसाठी ही एक उत्तम संधी उपलब्ध झाली आहे. ही स्पर्धा वैयक्तिक अभंग व भक्तिगीत गायन प्रकारात होणार असून विविध वयोगटातील स्पर्धकांना सहभागाची संधी देण्यात आली आहे.

स्पर्धेसाठी दोन गट निश्चित करण्यात आले आहेत. मोठा गट (जन्मतारीख २६ ऑगस्ट १९९६ ते २५ ऑगस्ट २०१०) आणि लहान गट (जन्मतारीख २६ ऑगस्ट २०१० ते २५ ऑगस्ट २०२१) असे विभाग करण्यात आले आहेत. दोन्ही गटांतील स्पर्धकांना आकर्षक रोख पारितोषिके तसेच प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत.

मोठ्या गटातील विजेत्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे ७,०००/-, ५,०००/- व ३,०००/- तर तीन उत्तेजनार्थ प्रत्येकी १,०००/- ची पारितोषिके देण्यात येणार आहेत. लहान गटातील स्पर्धकांसाठी प्रथम ५,०००/-, द्वितीय ३,०००/- व तृतीय २,०००/- अशी रोख पारितोषिके असून तीन उत्तेजनार्थ प्रत्येकी ७००/- ची पारितोषिके देण्यात येणार आहेत. सहभागी सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.

स्पर्धा रविवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून आयोजित करण्यात येणार आहे. स्पर्धेचे ठिकाण अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडीयम स्कूल, विश्रामबाग, अहिल्यानगर असे निश्चित करण्यात आले आहे. स्पर्धेच्या ठिकाणी स्पर्धक व गुरुजनांसाठी गरजेनुसार भोजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी मूळ प्रवेश अर्जासोबत जन्मतारीख व ओळख सिद्ध करणाऱ्या कागदपत्रांची प्रत सादर करणे आवश्यक आहे. मोठ्या गटासाठी प्रवेश शुल्क ७००/- तर लहान गटासाठी ५००/- निश्चित करण्यात आले आहे. मोठ्या गटाला ५ मिनिटे आणि लहान गटाला ४ मिनिटे गायनासाठी वेळ दिला जाणार आहे.

स्पर्धकांनी मराठी भाषेतील अभंग, भक्तिगीत किंवा भक्तिरसप्रधान रचना सादर कराव्यात. गायनासाठी हार्मोनियम, तबला, टाळ, चिपळ्या तसेच इलेक्ट्रॉनिक तानपुरा यांसारख्या वाद्यांचा वापर करता येईल. स्पर्धेचे परीक्षण तज्ज्ञ परीक्षकांमार्फत करण्यात येणार असून परीक्षकांचा निर्णय अंतीम राहील.

प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ सायंकाळी ४ वाजेपर्यंत आहे. अधिक माहितीसाठी व प्रवेश अर्ज प्राप्त करण्यासाठी लहान गट – यशश्री कुलकर्णी (मो.नं. ७६२०२२०५७९) व मोठा गट – अपर्णा बालटे (मो.नं. ९४२०९४६२१७) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे. स्पर्धा समन्वयक म्हणून पवन श्रीकांत नाईक कार्यरत असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त गायकांनी या भक्तिमय स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छाया फिरोदिया यांनी केले आहे.

# कल्याण रोडवरील अनुसया नगर डीपी रस्त्याच्या विकासासाठी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहरातील कल्याण रोड प्रभाग क्रमांक ९ मधील अनुसया नगर येथील डीपी रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे नागरिकांना रोजच्या प्रवासात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्याच्या तातडीने दुरुस्ती व विकासकामासाठी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदन देण्यात आले असून, रस्त्याचे काम लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते ॲड. युवराज शिंदे यांनी दिली.

यावेळी बोलताना ॲड. युवराज शिंदे म्हणाले की, अनुसया नगर येथील डीपी रस्ता हा परिसरातील प्रमुख संपर्क मार्ग असून या मार्गावरून दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी, महिला आणि वाहनचालकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. मात्र रस्त्यावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वाहतूक धोकादायक बनली असून नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

पावसाळ्यात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल आणि पाणी साचत असल्याने दुचाकीस्वारांना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेकदा किरकोळ अपघातही घडत असून शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि पादचारी यांना या रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे. त्यामुळे या रस्त्याचे काँक्रीटीकरण व कायमस्वरूपी विकासकाम तातडीने होणे आवश्यक असल्याची मागणी करण्यात आली.

अनुसया नगर परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात नागरी वसाहती विकसित झाल्या असून लोकसंख्याही वाढली आहे. त्यामुळे या भागातील मूलभूत सुविधांसह दर्जेदार रस्त्यांची आवश्यकता निर्माण झाली आहे. नागरिकांच्या या अडचणी लक्षात घेऊन आमदार संग्राम जगताप यांना निवेदन सादर करण्यात आले असून त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत रस्त्याचे काम मार्गी लावण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.

ॲड. युवराज शिंदे यांनी पुढे सांगितले की, आमदार संग्राम जगताप यांनी यापूर्वीही कल्याण रोड परिसराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. त्या माध्यमातून अनेक विकासकामे पूर्ण झाली असून परिसराचा चेहरामोहरा बदलत आहे. अनुसया नगर येथील डीपी रस्त्याचे कामही लवकरच सुरू होईल, अशी नागरिकांना अपेक्षा असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी शेषराव आडोळे, गणेश बेरड, राजेंद्र पाडळे यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# मोफत, दर्जेदार प्रशिक्षणामुळे ग्रामीण युवक–युवतींना करिअर घडविण्याची सुवर्णसंधी

## आमदार काळे यांच्या हस्ते प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**कोपरगाव–** स्पर्धेचे युग दिवसेंदिवस अधिक कठीण होत असताना शासकीय सेवेत प्रवेश मिळविण्यासाठी केवळ मेहनत पुरेशी राहत नाही. त्यासाठी योग्य मार्गदर्शन, आधुनिक पद्धतीचे प्रशिक्षण, अनुभवी प्रशिक्षक, नियमित शारीरिक सराव आणि स्पर्धा परीक्षांचा सखोल अभ्यास आवश्यक असतो. शहरांमध्ये या सर्व सुविधा सहज उपलब्ध असल्या तरी ग्रामीण भागातील अनेक होतकरू युवक–युवती आर्थिक अडचणी, अंतर आणि मार्गदर्शनाच्या अभावामुळे स्पर्धेत मागे पडतात. अनेक गुणवंत विद्यार्थ्यांची पोलीस दलात किंवा इतर शासकीय सेवेत दाखल होण्याची स्वप्ने केवळ संधींच्या अभावामुळे अपुरी राहतात.

याच वास्तवाची दखल घेत ग्रामीण विद्यार्थ्यांना त्यांच्या गावाजवळच दर्जेदार आणि मोफत प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी सुरेगाव येथे एक महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मौजे–सुरेगाव (पोस्ट–कोळपेवाडी) येथे कर्मवीर भाऊराव पाटील अकॅडमी अंतर्गत कर्मवीर शंकरराव काळे स्पर्धा परीक्षा व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले असून, या केंद्राचे उद्घाटन आमदार आशुतोषदादा काळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. आजही ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी शहरांकडे धाव घ्यावी लागते. महागडे क्लासेस, राहण्याचा खर्च, प्रवास आणि इतर आर्थिक अडचणींमुळे अनेक जण सुरुवातीलाच स्पर्धेच्या शर्यतीतून बाहेर पडतात. अशा परिस्थितीत सुरेगाव येथे सुरू झालेले हे प्रशिक्षण केंद्र ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी मोठा आधार ठरणार आहे. येथे पोलीस भरतीसह विविध स्पर्धा परीक्षांसाठी लेखी तयारी, शारीरिक प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, मुलाखत मार्गदर्शन आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या उपक्रमामुळे केवळ पोलीस भरतीसाठीच नव्हे, तर ग्रामीण भागात स्पर्धा परीक्षांची सकारात्मक चळवळ उभी राहण्यास मदत होणार आहे. गावातील विद्यार्थ्यांना आत्मविश्वास मिळणार असून, त्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा मिळाल्यास भविष्यात अनेक अधिकारी, पोलीस कर्मचारी आणि शासकीय सेवक या परिसरातून घडू शकतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणजी चंद्रे यांनी पोलीस भरती प्रक्रियेतील तांत्रिक बाबींचे सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास स्कूल कमिटी सदस्य हेमंत पाटील वाबळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कचरू पाटील कोळपे, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष वाल्मिक आप्पा कोळपे, उपाध्यक्ष दिलीपराव वाबळे, खजिनदार राजेंद्र पाटील ढोमसे, युवा उद्योजक कमलेश भळगट, यशवंत निकम, मोतीराम निकम यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना शारीरिक प्रशिक्षण देणारे सेवानिवृत्त सैन्य अधिकारी राजेंद्र मुमाळ, बापूसाहेब बावळे आणि गौतमी बनकर यांचा आमदार आशुतोषदादा काळे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील शिक्षकदेखील नियमित अध्यापनाव्यतिरिक्त स्पर्धा परीक्षांसाठी लेखी मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास आणि विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देणार आहेत.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य प्रकाश चौरे यांनी अकॅडमीची उद्दिष्टे स्पष्ट केली. उपप्राचार्य देविदास माने, पर्यवेक्षक सच्चिदानंद झावरे, कौशल्य विकास प्रमुख आप्पासाहेब आगवन, बाबासाहेब आभाळे, अकॅडमी प्रमुख तुषार बोरसे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन नितीन निकम यांनी केले, तर आभार बाबासाहेब पवार यांनी मानले.

ग्रामीण भागातील एकही गुणवंत विद्यार्थी केवळ मार्गदर्शनाच्या अभावामुळे मागे राहू नये, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचा जास्तीत जास्त युवक–युवतींनी लाभ घ्यावा आणि पोलीस दलासह विविध शासकीय सेवांमध्ये आपले स्थान निर्माण करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# श्रीराम कृष्ण एज्युकेशन फाउंडेशनमध्ये गुरुपौर्णिमा आणि हाऊस पदग्रहण समारंभ उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** ज्ञान, शिस्त आणि नेतृत्वाचा एक अपूर्व संगम साधत आज श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामवतार मानधना कनिष्ठ महाविद्यालयात गुरुपौर्णिमा आणि विद्यार्थी शिक्षक हाऊस पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

आषाढ महिन्यातील पौर्णिमा ही गुरुपौर्णिमा म्हणून साजरी केली जाते . गुरुप्रती असलेला आदर तसेच महर्षी व्यास यांची आठवण म्हणून हा दिवस सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जातो याच दिवसाचे औचित्य साधून विद्यालयांमध्ये हाऊस पदग्रहण समारंभ एडवोकेट शरद पल्लोड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुरूंची महती सांगणारे गीत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केले. यानंतर यंदाच्या शैक्षणिक वर्षात आपल्या उत्कृष्ट कामगिरीने आदर्श विद्यार्थी म्हणून निवडले गेलेले चिरंजीव जयंत आनंद सारसर व आदर्श विद्यार्थिनी म्हणून कुमारी गायत्री पंकज गांधी यांची निवड करण्यात आली. त्यांना बॅच देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर राणी अहिल्या, राणी लक्ष्मी, राणा प्रताप, राजा शिवाजी या चारही हाऊस मध्ये असणाऱ्या विद्यार्थी प्रतिनिधींची तसेच त्या त्या हाऊसच्या शिक्षक प्रतिनिधींची ही नावे यावेळी जाहीर करण्यात आली. या सर्वांनाही बॅच देऊन सन्मानित करण्यात आले.

नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधी आणि चारी हाऊसचे विद्यार्थी व शाळेतील विद्यार्थ्यांनी मिळून उत्कृष्ट आणि दिमाखदार शिस्तबद्ध पद्धतीने संचलन केले. विद्यालयाच्या प्राचार्या सौ गगन वधवा यांनी विद्यार्थ्यांना गुरु शिष्याचे नाते कसे असावे हे सांगितले व तसेच नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना त्यांच्या कर्तव्याचा संदेश देखील दिला.

पदग्रहण समारंभाचा अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे शपथविधी सोहळा यावेळी विद्यालयाच्या समन्वयक सुषमा उजागरे यांनी नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींना तसेच नियुक्त झालेल्या शिक्षकांना त्यांच्या पदाची आणि कर्तव्याची सामूहिक शपथ दिली.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले एडवोकेट शरद पल्लोड यांनी आपल्या मनोगतात सर्वप्रथम विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे आणि संपूर्ण सोहळ्याचे भरभरून कौतुक केले. त्याचबरोबर त्यांनी आजच्या बदलत्या काळातील युवा पिढीवर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे हे सांगितले व या पिढीवर कोणत्याही प्रकारचा दबाव न टाकता त्यांच्यातील सुप्त गुण ओळखून त्यांना विश्वासात घेऊन शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मित्र आणि मार्गदर्शक बनून त्यांच्यात सकारात्मक बदल घडून आणावा असे प्रतिपादन केले.

संस्थेचे व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री श्री गोपाल धूत आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की गुरु आणि शिष्य हे अतिशय पवित्र असे नाते आहे . गुरूंच्या मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांना यशाची द्वारे खुली होत असतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांनी नेहमी गुरूंचा आदर केला पाहिजे.

यावेळी शाला समितीचे चेअरमन व संस्थेचे उपाध्यक्ष श्री नंदकुमार झंवर, उपाध्यक्ष श्री मोहनलाल मानधना, श्री राजेश झंवर, सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव श्री बजरंग दरक, संस्थेचे विश्वस्त श्री गोपाल जाखोटिया,श्री पुरुषोत्तम भाई पटेल,श्री रवींद्र गुजराथी, श्री अरुण झंवर उपप्राचार्या संपदा देशपांडे, समन्वयक श्री श्रेय कुमार गुंड्डू, सौ प्रांजली भोसले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ मोश्यमी लोंढे यांनी केले.

संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त सावेडी शिंदे मळा येथे

# सोमवार ३ पासून अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त सावेडी शिंदे मळा येथे सोमवार दि ३ पासून अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे सोमवार दि ३ ऑगस्ट ते सोमवार दि १० ऑगष्ट पर्यंत सप्ताह सुरु राहणार आहे. यामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे .सोमवार दि ३ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजता ह भ प बाबासाहेब गोलांडे (वाकोडीकर) मंगळवार ४ ऑगस्ट रोजी ह भ प तुळशीराम महाराज लबडे (अहिल्यानगर )बुधवार दि ५ ऑगस्ट रोजी ह भ प कपिल महाराज माळवदे(अहिल्यानगर ) गुरुवार ६ ऑगस्ट रोजी ह भ प निवृत्ती महाराज नामदास (नामदेव महाराज यांचे १७ वे वंशज ,पंढरपूर ) शुक्रवार ७ ऑगस्ट रोजी ह भ प विठ्ठल महाराज वाघ (उजनी पिपंळगाव ) शनिवार दि ८ रोजी ह भ प वर्षाताई काळे / कोकाटे ( झी टॉकीज फेम,बीड ) रविवार दि ९ ऑगस्ट रोजी ह भ प ओंकार महाराज जोंजाळ (इंदापूर ) रविवार दिनांक ९ रोजी दुपारी ४ .३० वाजता दिंडी मिरवणुकीस प्रारंभ होईल त्यानंतर दीपप्रज्वल ,पारायण सांगता तसेच सोमवार दि १० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता ह भ प नवनाथ महाराज शास्त्री (मच्छिंद्रनाथ देवस्थान भालगाव )यांचे काल्याचे किर्तन होईल त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

अशी माहिती अध्यक्ष अशोक वडे यांनी दिली. तसेच यावेळी विविध भजनी मंडळांचे दुपारी ३ ते ५ या वेळेत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे यामध्ये नित्य हरिपाठ श्री नामदेव भजनी मंडळ शिंदे मळा, राधे राधे भजनी मंडळ, पाईपलाईन रोड, दुर्गा भजनी मंडळ बालिकाश्रम रोड, संस्कृती भजनी मंडळ बागडे मळा ,श्री ज्ञानमाऊली भजनी मंडळ श्रीराम चौक, श्री संत नामदेव भजनी मंडळ शिंदे मळा, ओम संगीत विद्यालय श्री राजेंद्र मल्हार आणि सर्व विद्यार्थी तसेच ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे व्यासपीठ नेतृत्व ह भ प पेहेरे आणि ह भ प राजू पाटकुले हे करणार आहे तसेच सकाळी काकड आरती, ज्ञानेश्वरी पारायण, महिला भजनी मंडळाचे भजन ,हरिपाठ आणि रात्री हरिकीर्तन असे दिवसभर सप्ताहाकाळात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले आहे.

सप्ताह यशस्वी त्यासाठी नामदेव शिंपी समाज ट्रस्टचे अध्यक्ष अशोक वडे, उपाध्यक्ष विजय काकडे, सचिव राजेंद्र बगाडे, सहसचिव सुधीर नेवासकर, खजिनदार कृष्णा भस्मे आदींसह सर्व विश्वस्त मंडळ, युवक मंडळ, महिला मंडळ आदी प्रयत्नशील आहे. वरील सर्व कार्यक्रम सावेडी शिंदे मळा येथील श्री संत नामदेव महाराज मंदिर येथे होणार आहे,तरी जास्तीत जास्त भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# टाकळी ढोकेश्वर येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पारनेर–** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर गावात आज अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी भव्य स्वरूपात साजरी करण्यात आली. टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात या दोन्ही महामानवांना अभिवादन करण्यात आले. यावेळी अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले आणि त्यांना नमन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांनी दोन्ही थोर पुरुषांच्या स्मृतींना उजळवून त्यांच्या आदर्शांचे स्मरण केले. अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्रातील थोर साहित्यिक, समाजसुधारक आणि दलित चळवळीचे अग्रणी नेते होते. त्यांच्या लेखनातून आणि विचारांतून शोषित–पीडित समाजाच्या वेदनांना वाचा फुटली होती. तर लोकमान्य टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे महानायक, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हे घोषवाक्य देणारे आणि राष्ट्रीय जागृतीचे अग्रदूत होते. या दोन्ही महामानवांच्या जयंती–पुण्यतिथी निमित्ताने गावातील नागरिकांनी त्यांच्या आदर्शांचे अनुकरण करण्याची प्रतिज्ञा केली.

या कार्यक्रमास टाकळी ढोकेश्वर गावच्या सरपंच अरुणा खिलारी, माजी सरपंच शिवाजी खिलारी, ज्येष्ठ कार्यकर्ते श्रावण गायकवाड, माजी ग्रामपंचायत सदस्य दीपक साळवे, विक्रम झावरे, बबलू झावरे, माळीभाऊ रांधवन, देविदास आल्हाट, सुनील माकरे, पिंटू जाधव, संकेत झावरे, संदीप आल्हाट, श्यामा आल्हाट, सुशांत आल्हाट, प्रतीक चव्हाण, लक्ष्मीकांत आल्हाट, गणेश वैराळ यांच्यासह गावातील मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी एकत्र येऊन दोन्ही थोर पुरुषांना आदरांजली अर्पण केली.

माजी सरपंच शिवाजी खिलारी व विक्रम झावरे यांनी यावेळी उपस्थित राहून दोन्ही महामानवांना पुष्पहार अर्पण करून नमन केले. गावातील विकास व सामाजिक एकतेसाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या आदर्शांनुसार समाजात एकता, समता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना अभिवादन; मनपा सहकारी पतसंस्थेकडून पुष्पहार अर्पण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** महानगरपालिका सहकारी पतसंस्थेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या सामाजिक, साहित्यिक व लोकशाहीर म्हणून केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर त्यांनी आपल्या प्रभावी लेखणी आणि शाहिरीच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची व्यापक चळवळ उभी केली. समाजातील वंचित, श्रमिक, कष्टकरी आणि अन्यायग्रस्त घटकांचा आवाज त्यांनी आपल्या साहित्याद्वारे बुलंद केला. त्यामुळेच त्यांना 'लोकशाहीर' हा मानाचा किताब मिळाला.

ते पुढे म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांचे जीवन संघर्षमय होते. कामगार चळवळीशी एकरूप होत त्यांनी समाजातील विषमता, अन्याय आणि शोषणाविरुद्ध सातत्याने आवाज उठविला. पोवाडे, लावण्या, कथा, कादंबऱ्या, नाटके आणि लोकनाट्य अशा विविध साहित्यप्रकारांतून त्यांनी सामाजिक वास्तव मांडले. त्यांच्या साहित्यामध्ये समता, सामाजिक न्याय, श्रमिकांचे जीवन, मानवी मूल्ये आणि अन्यायाविरोधातील संघर्ष यांना विशेष स्थान आहे. त्यांच्या विचारांतून आजच्या युवकांना प्रेरणा, सामाजिक भान आणि परिवर्तनाची ऊर्जा मिळते. प्रत्येकाने त्यांच्या विचारांचे आचरण करून समाजहितासाठी कार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन कैलास चावरे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी महाराष्ट्राच्या एकीकरणाच्या लढ्यात तसेच कामगारांच्या प्रश्नांसाठी आपल्या शाहिरीच्या माध्यमातून प्रभावी जनजागृती केली. सामाजिक परिवर्तनासाठी लोककलेचा प्रभावी वापर करणारे ते असामान्य व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या कार्याचा आदर्श समाजाने कायम स्मरणात ठेवला पाहिजे, असे ते म्हणाले.

# विद्याधाममध्ये लोकमान्य टिळक व आणाभाऊ साठे यांना अभिवादन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेत लोकमान्य टिळक यांना पुण्यतिथी पुण्यतिथी निमित्त व अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले .

प्रशालेतील विद्यार्थी धन्वंतरी पडवळ , दिव्या शिंदे , राजवीर शेळके , स्वरांजली होळकर , राजलक्ष्मी चव्हाण , अक्षदा जाधव यांनी लोकमान्य टिळक व आण्णाभाऊ साठे यांच्याविषयी माहिती मनोगतातून सांगितली .

प्रशालेचे अध्यापक मनोहर परदेशी , वंदना गायकवाड यांनी लोकमान्य टिळक व आण्णाभाऊ साठे यांचे चरित्र उलगडत माहिती मनोगतून दिली . प्रशालेचे प्राचार्य पी . जे . मेरगळ यांनी आपल्या मनोगतातून लोकमान्य टिळकांनी ब्रिटीश राजवटीत केलेला संघर्ष , भोगलेली शिक्षा व भारतमातेसाठी केलेला त्याग याविषयी माहिती सांगितली . आण्णाभाऊ साठे यांचे स्वातंत्र्यलढ्यातील व साहित्य क्षेत्रातील योगदान याबाबत माहिती दिली .

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एम . एम . बनकर यांनी केले . तर आभार राजेंद्र जगताप यांनी मानले . यावेळी पर्यवेक्षक एन .एस .डुंबरे , क्रीडाशिक्षक संदीप घावटे व सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते .

(पान १ वरून)

## अण्णाभाऊ साठे व वीर लहुजी वस्ताद साळवे यांचे पूर्णाकृती पुतळे अहिल्यानगरात उभारणार - आमदार संग्राम जगताप

प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर शहरात महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपत विकासालाही गती मिळत असल्याचे सांगत, समाजबांधवांशी चर्चा करून जागा निश्चित करण्यात येणार असून प्रशासनाची आवश्यक परवानगी व ठराव पूर्ण झाल्यानंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि वीर लहुजी वस्ताद साळवे यांचे पूर्णाकृती पुतळे अहिल्यानगरात उभारण्यात येतील, अशी घोषणा आमदार संग्राम जगताप यांनी केली.

कार्यक्रमाच्या शेवटी अंकुश मोहिते यांनी समाजबांधवांच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांचे आभार मानले. कार्यक्रमास विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लाल टाकी परिसरात आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते अभिवादन

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून लाल टाकी परिसरात विश्व हिंदू परिषदेतर्फे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. समाजातील गरजवंतांपर्यंत पोहोचून सेवा कार्य करणे, वारकऱ्यांची सेवा तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचे कार्य विश्व हिंदू परिषद करत आहे. लाल टाकी परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले.

तसेच राम वडागळे म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहात साजरी होत आहे. या निमित्ताने लाल टाकी परिसरात रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, भोजन भंडारा तसेच भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात १०६ जण रक्तदान करतील असा निर्धार केला आहे. गौरवशाली मातंग इतिहास संवर्धन संघटन, मातंग एकता आंदोलन, सत्यशोधक बहुजन आघाडी आणि विश्व हिंदू परिषद या सर्व संघटनांच्या संयुक्त विद्यमाने हा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असल्याचे त्यांनी सांगितले.

लालटाकी शाखेच्या या कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा जागर समाजात निर्माण करण्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम राबविण्यात आल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

## राजमाता जिजाऊच्या ५ अत्याधुनिक एसटी बसेचे लोकार्पण

देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.

यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, भाजप तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, ज्येष्ठ पत्रकार संजय वाघमारे, शंकरराव नगरे, दत्ता नाना पवार, नगरसेवक अशोक चेडे, पै. युवराज पठारे, तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, शहरप्रमुख कविता औटी, नवनाथ सोबले, कांतीलाल ठाणगे, शहराध्यक्ष राजेंद्र औटी, संदीपराव रोहोकले, अपर्णा खामकर, लहु भालेकर, विठ्ठल कावरे, माऊली औटी, रामदास दाते, कंट्रोलर कुसकर यांच्यासह एसटी महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, चालक–वाहक, महायुतीचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार काशिनाथ दाते यांच्या पुढाकारामुळे पारनेर आगाराला मिळालेल्या या पाच राजमाता जिजाऊ अत्याधुनिक बसेसमुळे तालुक्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला नवी गती मिळणार असून, प्रवाशांसह नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण